प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ०८.०२.२०२१**

# कोपर गावाच्या श्री. स्वयंभू गणेश मंदिराचा विमानतळ पुनर्वसन क्षेत्रात जल्लोषात उद्घाटन सोहळा संपन्न

"कोपर गावाच्या गणेश मंदिराची पुनर्वसन क्षेत्रामध्ये पुन:स्थापना झाल्याचा तसेच विमानतळबाधित गावांतील ग्रामस्थांचा धार्मिक व सांस्कृतिक ठेवा आता नव्या रूपात जतन होत असल्याचा आनंद ग्रामस्थांप्रमाणेच सिडकोलाही आहे", असे उद्गार **डॉ. संजय मुखर्जी**, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी काढले. पुष्पक नोड या नवी मुंबई विमानतळबाधितांच्या पुनर्वसन आणि पुन:स्थापना क्षेत्रात उभारण्यात आलेल्या कोपर गावाच्या श्री स्वयंभू चिंतामणी गणेश मंदिराचे उद्घाटन डॉ. संजय मुखर्जी यांच्या शुभहस्ते ०८ फेब्रुवारी, २०२१ रोजी करण्यात आले त्या वेळी त्यांनी हे उद्गार काढले. विमानतळबाधित कोपर गावाच्या श्री स्वयंभू चिंतामणी मंदिर हे भूखंड क्र.५३, सेक्टर-आर४, पुष्पक नोड, येथे उभारण्यात आले आहे. या प्रसंगी सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक **श्री. अश्विन मुद्गल** उपस्थित होते.

भारताच्या इतिहासात प्रथमच प्रकल्पबाधितांच्या चेहऱ्यावर मंदीराचे नवीन जागी उद्घाटन करताना आनंद, उत्साह व समाधान यांचे मिश्रण पहायला मिळाले. याचे कारण म्हणजे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प व अनुषंगिक कामासाठी स्थलांतरीत होणाऱ्या बांधकामाबद्दल प्रकल्पबाधितांना २२.५% व पुनर्वसन व पुनःस्थापना योजनेंतर्गत देशातील सर्वोत्तम पॅकेज देण्यात आले आहे. कोपर गाव ग्रामस्थांनीदेखील एक पाऊल पुढे येऊन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा महत्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लावण्यास मोलाचे सहकार्य केले आहे.

प्रकल्पबाधितांना देण्यात येणाऱ्या सर्वोत्तम पॅकेजसोबतच प्रकल्पबाधितांच्या गाव मंदिरांसाठी सिडकोतर्फे पुनर्वसन व पुन:स्थापना क्षेत्रात भूखंडदेखील देण्यात आले आहेत. विमानतळ प्रकल्पबाधित सर्व दहा गावांच्या मागण्यांनुसार त्यांच्या गावांमधील सर्व मंदिरांसाठी एक भूखंड देण्यात आला आहे. सिडकोतर्फे गावातील मुख्य मंदिराच्या बांधकामासाठी रू. १ कोटी देण्यात आलेले आहेत. सिडकोने नेहमीच प्रकल्पबाधितांच्या सर्वंकष पुनर्वसनावर भर दिला आहे. याचाच परिपाक म्हणजे प्रकल्पबाधितांची सामाजिक गरज लक्षात घेऊन त्यांच्या मंदिरांसाठी सिडकोतर्फे भूखंड व मंदिर बांधकामासाठी निधी अदा केला आहे.

---

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**